## निवडक

### उपनगराध्यक्षांकडून शाळांची पाहणी

**मुरूड-जंजिरा :** नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर मुरूड-जंजिरा नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष तथा आरोग्य व शिक्षण सभापती विरेंद्र भगत यांनी नगरपरिषद शिक्षण मंडळाच्या विविध शाळांना भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी शाळांतील पायाभूत सुविधांचा आढावा घेत शिक्षक व कर्मचाऱ्यांशी संवाद साधत विविध समस्या जाणून घेतल्या. या पाहणी दौऱ्यात गटनेते तथा पाणीपुरवठा सभापती पांडुरंग आरेकर, बालकल्याण समिती सभापती नगमाना खानजादे, नगरसेवक मनिष विरुकुड, विरोधी पक्षनेत्या अंकिता गुरव, नगरसेवक ॲड. रूपेश पाटील तसेच शिक्षकवर्ग उपस्थित होता.

### पाणीपुरवठ्यात २० टक्के कपात

**कल्याण :** भारतीय हवामान खात्याने यंदा अल निनो आणि आयओडीच्या प्रभावामुळे पावसाळा लांबण्याची शक्यता वर्तविली असल्याने आगामी काळातील जलसाठ्याचे नियोजन करण्यासाठी जलसंपदा विभागाने पाणीपुरवठ्यात २० टक्के कपात करण्याचे निर्देश दिले आहेत. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने बारावे, मोहिली आणि नेतिवली जलशुद्धीकरण केंद्रांमधून होणाऱ्या पाणीपुरवठ्यात टप्प्याटप्प्याने कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने जारी केलेल्या सूचनेनुसार संबंधित भागांमध्ये नियोजित पद्धतीने २४ तास पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे. संबंधित दिवशी रात्री १२ वाजल्यापासून दुसऱ्या दिवशी रात्री १२ वाजेपर्यंत हा बंद लागू राहणार आहे.

### फार्मर आयडी नोंदणी पूर्ण करण्याचे आवाहन

**भिवंडी :** भिवंडी तालुक्यातील उर्वरित ८ हजार ८५९ प्लॉटधारक शेतकऱ्यांनी फार्मर आयडी नोंदणी तातडीने पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन भिवंडी कृषी विभागाने केले आहे. कृषी जनगणनेनुसार तालुक्यात एकूण २९ हजार ८४२ प्लॉटधारक शेतकरी असून त्यापैकी आतापर्यंत २० हजार ९८३ शेतकऱ्यांनी फार्मर आयडी नोंदणी पूर्ण केली आहे. राज्यात 'ॲग्रीस्टॅक' योजनेची अंमलबजावणी सुरू आहे. या योजनेअंतर्गत शेतकरी कृषी विभागाच्या विविध अनुदान, निविष्ठा आणि लाभाच्या योजनांपासून वंचित राहू नयेत, यासाठी फार्मर आयडी नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे.

# पालिकेची प्रशासकीय घडी विस्कटणार?

## वर्षअखेरीस अनुभवी वरिष्ठ अधिकारी निवृत्त होणार




### पोकळी भरून काढण्यासाठी ठोस तयारी नाही ?

महापालिकेतील अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त मनीष जोशी, प्रदूषण नियंत्रण अधिकारी मनीषा प्रधान, विद्युत विभागाच्या शुभांगी केसवानी, सुधीर गायकवाड, मोहन कलाल यांच्यासह अनेक महत्त्वाचे अधिकारी येत्या काही महिन्यांत निवृत्त होणार आहेत. या अधिकाऱ्यांकडे शहरातील विकासकामे, आर्थिक नियोजन, पर्यावरणविषयक बाबी, पायाभूत सुविधा, विद्युत व्यवस्था तसेच प्रशासकीय प्रक्रियेचा अनेक वर्षांचा अनुभव आहे. त्यांच्या निवृत्तीमुळे निर्माण होणारी पोकळी भरून काढण्यासाठी महापालिका प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस तयारी केल्याचे दिसून येत नाही.

**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेच्या प्रशासनाचा कणा मानले जाणारे अनेक वरिष्ठ अधिकारी येत्या डिसेंबरअखेर सेवेतून निवृत्त होणार असल्याने वर्षअखेरीस महापालिकेची प्रशासकीय घडी विस्कटण्याची भीती व्यक्त केली जात आहे. आधीच अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कमतरतेने ग्रासलेल्या महापालिकेत अनेक विभागांचा अतिरिक्त कार्यभार मोजक्या अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आला आहे. अशा परिस्थितीत अनुभवी अधिकाऱ्यांच्या निवृत्तीमुळे प्रशासनाचा गाडा आणखी विस्कळीत होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

विशेष म्हणजे, मागील काही वर्षांपासून दरमहा सरासरी ३० ते ५० अधिकारी व कर्मचारी सेवेतून निवृत्त होत आहेत. मात्र त्यांच्या जागी नव्या अधिकाऱ्यांची भरती करण्याचा प्रश्न अद्याप प्रलंबित आहे. भरती प्रक्रिया वारंवार पुढे ढकलली जात असल्याने अनेक विभाग रिक्त पदांवरच चालत आहेत. परिणामी उर्वरित अधिकाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण वाढला असून निर्णय प्रक्रियेलाही विलंब होत आहे. चार वर्षांनंतर झालेल्या महापालिका निवडणुकीत मोठ्या प्रमाणात नव्या चेहऱ्यांना संधी मिळाली आहे. जवळपास ५० टक्के नगरसेवक प्रथमच सभागृहात दाखल झाले आहेत. महापालिकेचे नियम, प्रशासकीय प्रक्रिया, विकासकामांचे प्रस्ताव, निधी मंजुरी, पत्रव्यवहार आणि विभागीय कामकाज याबाबत मार्गदर्शन करण्याची महत्त्वाची जबाबदारी वरिष्ठ अधिकाऱ्यांवर असते. मात्र हेच अधिकारी निवृत्त होत असल्याने नव्या लोकप्रतिनिधींना प्रशासन समजून घेण्यासाठी अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.

महापालिकेच्या अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांची माहिती, न्यायालयीन प्रकरणांची पार्श्वभूमी, विकास आराखड्यांचे तपशील, आर्थिक व्यवहारांची माहिती आणि विभागीय समन्वयाचा अनुभव या अधिकाऱ्यांकडे आहे. त्यामुळे त्यांच्या निवृत्तीनंतर संस्थात्मक स्मरणशक्तीच हरविण्याचा धोका निर्माण झाला आहे. नवीन अधिकारी रुजू झाले तरी त्यांना कामकाज पूर्णपणे समजून घेण्यासाठी बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे.

दरम्यान, शहराची लोकसंख्या वाढत असताना आणि पायाभूत सुविधांवरील ताण वाढत असताना प्रशासनातील मनुष्यबळाची कमतरता अधिक गंभीर बनत चालली आहे. रस्ते, पाणीपुरवठा, मलनिस्सारण, पर्यावरण, विद्युत व्यवस्था, कर आकारणी आणि नगररचना यांसारख्या महत्त्वाच्या विभागांमध्ये अनुभवी अधिकाऱ्यांचा अभाव निर्माण झाल्यास त्याचा थेट परिणाम नागरिकांना मिळणाऱ्या सेवांवर होऊ शकतो.

महापालिका प्रशासनाने वेळेत भरती प्रक्रिया राबवून रिक्त पदे भरण्याऐवजी वर्षानुवर्षे तात्पुरत्या व्यवस्थेवर भर दिल्याचा आरोपही केला जात आहे.

# वसई-विरारमध्ये अनधिकृत शाळांचे पेव

## सामाजिक कार्यकर्त्यांकडून कारवाईची मागणी

**वसई :** वसई-विरार परिसरात अनधिकृत शाळांची संख्या वाढत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. अनेक शाळा आवश्यक परवानग्या व सुरक्षा निकषांचे पालन न करता अनधिकृत इमारतींमध्ये चालविल्या जात असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते एलायस जोसेफ डिसिल्व्हा यांनी केला आहे.

यासंदर्भात मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री, पालकमंत्री, प्राथमिक शिक्षणाधिकारी (जिल्हा परिषद पालघर), स्थानिक आमदार तसेच संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. या निवेदनात वसई, विरार आणि नालासोपारा परिसरातील काही शाळा आवश्यक परवानग्या, मूलभूत सुविधा आणि सुरक्षा मानकांशिवाय चालविल्या जात असल्याचा दावा करण्यात आला आहे.

निवेदनानुसार, अनेक शाळांकडे स्वतंत्र खेळाचे मैदान नाही, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध नाहीत, तसेच आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी आवश्यक यंत्रणांचाही अभाव आहे. काही शाळा अनधिकृत इमारतींमध्ये भरवल्या जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून नियमबाह्य पद्धतीने चालणाऱ्या शाळांवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी एलायस डिसिल्व्हा यांनी केली आहे.

# उत्तनमध्ये जुन्या काळातील जिवंत तोफगोळा आढळला

**भाईंदर :** भाईंदर पश्चिमेच्या उत्तन परिसरात मंगळवारी जुन्या काळातील एक जिवंत तोफगोळा आढळून आला. मीरा-भाईंदर पोलीस आणि राष्ट्रीय सुरक्षा रक्षक दल म्हणजेच एनएसजी यांच्या संयुक्त पथकाने तातडीने कारवाई करत हा तोफगोळा सुरक्षितपणे निकामी केला. पोलिसांच्या सतर्कतेमुळे मिरा भाईंदर शहरातील एक मोठी दुर्घटना टळली असून संपूर्ण कारवाईदरम्यान कोणत्याही प्रकारची जीवित किंवा वित्तहानी झालेली नाही.

उत्तन परिसरातील जमिनीत गाडलेला एक संशयास्पद धातूचा गोळा स्थानिक नागरिकांना आढळून आला होता. नागरिकांनी याबाबत तातडीने पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तपासणी केली असता, ती साधी वस्तू नसून अविस्फोटित स्फोटक सामग्री असण्याची शक्यता समोर आली. मंगळवारी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास विशेष तांत्रिक प्रक्रियेद्वारे हा तोफगोळा निकामी करण्यात आला. तपासादरम्यान ही सामग्री अविस्फोटित स्फोटक असल्याचे स्पष्ट झाले.

सर्व सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करून ही मोहीम फत्ते करण्यात आली. क्षमता विकास उपक्रमांतर्गत नुकतेच मीरा-भाईंदर पोलिसांना आयईडी आणि विविध प्रकारच्या स्फोटकांची ओळख पटवण्याबाबत विशेष प्रशिक्षण देण्यात आले होते, अशी माहिती एनएसजी अधिकाऱ्यांनी दिली.

# गोल मैदान परिसरात हजारो लिटर पाण्याची नासाडी

## पाइपलाइन गळतीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

**उल्हासनगर :** उल्हासनगर शहरात एकीकडे पाणीटंचाईचे गंभीर संकट निर्माण झाले असताना दुसरीकडे गोल मैदान रोडवरील कॅम्ब्रिज शोरूमसमोरील सती भवन परिसरात पाण्याच्या पाइपलाइनमधून मोठ्या प्रमाणात गळती होत असल्याचा प्रकार समोर आला आहे.

या गळतीमुळे दररोज हजारो लिटर पिण्यायोग्य पाणी वाया जात असून त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर नागरिकांनी महानगरपालिका प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार, सती भवनच्या बाहेरील तसेच लगतच्या परिसरातील जलवाहिनीमधून अनेक दिवसांपासून सतत पाणी गळत आहे. या गळतीमुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचत असून पिण्यायोग्य पाणी थेट नाल्यांमध्ये आणि गटारांमध्ये वाहून जात आहे.

शहरातील अनेक भागांमध्ये नागरिकांना अपुऱ्या पाणीपुरवठ्याचा सामना करावा लागत असताना दुसरीकडे अशा प्रकारे पाण्याची नासाडी होत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे.

नागरिकांनी उल्हासनगर महानगरपालिकेच्या जलपुरवठा विभागाने तातडीने घटनास्थळी पाहणी करून गळती दुरुस्त करावी, अशी मागणी केली आहे. वाढती पाणीटंचाई आणि त्याचवेळी होत असलेली पाण्याची उधळपट्टी लक्षात घेता प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन त्वरित कारवाई करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.



# सानपाड्यात गुटखा विक्रेत्यांवर धडक कारवाई

## १.२९ लाख रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त

**नवी मुंबई :** सानपाडा परिसरात प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाल्याची खुलेआम विक्री करणाऱ्यांविरोधात अन्न व औषध प्रशासन विभाग आणि सानपाडा पोलिसांनी संयुक्त कारवाई करत तब्बल १ लाख २९ हजार ७३० रुपयांचा प्रतिबंधित गुटख्याचा साठा जप्त केला आहे. या प्रकरणी आठ जणांविरोधात सानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सानपाडा परिसरातील विविध पानटपऱ्या आणि किराणा दुकानांमधून प्रतिबंधित गुटखा व पानमसाल्याची विक्री सुरू असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाला मिळाली होती. त्यानुसार ८ जून रोजी दुपारी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने सानपाडा सेक्टर ५, ६, १० आणि ११ परिसरातील विविध पानटपऱ्या व दुकानांवर छापेमारी केली. या कारवाईदरम्यान महाराष्ट्र शासनाने विक्रीस बंदी घातलेला केसरयुक्त विमल पान मसाला, राजश्री पान मसाला, डी-१ तसेच इतर सुगंधित तंबाखूजन्य पदार्थांचा मोठा साठा आढळून आला. पथकाने हा संपूर्ण साठा जप्त केला असून त्याची किंमत १ लाख २९ हजार ७३० रुपये असल्याचे सांगण्यात आले.

तपासादरम्यान सानपाडा परिसरातील आठ पानटपरी व किराणा दुकान चालक प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांची साठवणूक व विक्री करत असल्याचे निष्पन्न झाले.

## अनधिकृत बांधकामांविरोधात धडक मोहीम

**उरण :** नवी मुंबईतील उलवे नोड परिसरात वाढत्या अनधिकृत बांधकामांना आणि बेकायदेशीर व्यवसायांना आळा घालण्यासाठी सिडकोने धडक मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत बेकायदेशीर मद्यविक्री करणाऱ्या टपऱ्या, विनापरवानगी उभारलेली पत्राशेडे आणि इतर अनधिकृत संरचनांवर मोठी कारवाई करण्यात आली.

या कारवाईदरम्यान सेक्टर २३ मधील प्लॉट क्रमांक ४४, ५८ आणि १३९ तसेच सेक्टर २ मधील प्लॉट क्रमांक १४८ येथील अनधिकृत बांधकामांवर हातोडा चालविण्यात आला. याशिवाय सेक्टर ३ मधील मोरावे गाव परिसरात विनापरवानगी उभारण्यात आलेल्या संरचनांविरोधातही कठोर कारवाई करण्यात आली.

# डॉ. मोहिनी धर्मा यांच्यावर प्रशासकीय कारवाई

## आरोग्य केंद्रांतील अनागोंदी अखेर भोवली

**उल्हासनगर :** उल्हासनगर महापालिकेच्या आरोग्य विभागात मोठी प्रशासकीय उलथापालथ झाली असून, आरोग्य केंद्रांतील अनागोंदी कारभार, स्वच्छतेचा अभाव, औषधसाठा व्यवस्थापनातील त्रुटी, भटक्या श्वानांच्या प्रश्नावरील निष्क्रियता तसेच डॉक्टरांकडून आर्थिक लाभ मागितल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. मोहिनी धर्मा यांच्याकडील पदाचा कार्यभार महापालिका आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी तात्काळ काढून घेतला आहे. या कारवाईमुळे महापालिकेच्या आरोग्य विभागात खळबळ उडाली आहे.

महापालिका प्रशासनाने जारी केलेल्या आदेशानुसार, शहरातील आरोग्य सेवा व्यवस्थेतील गंभीर त्रुटींची दखल घेत ही कारवाई करण्यात आली. काही दिवसांपूर्वी आयुक्तांनी शहरातील विविध नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेट दिली असता अनेक गंभीर बाबी निदर्शनास आल्या होत्या. आरोग्य केंद्रांतील पायाभूत सुविधांची दुरवस्था, अस्वच्छ परिसर, कार्यालयीन नोंदींची अपुरी व विस्कळीत व्यवस्था, तसेच औषधसाठा आणि साहित्य व्यवस्थापनातील निष्काळजीपणा यामुळे नागरिकांच्या आरोग्य सेवांवर विपरीत परिणाम होत असल्याचे आढळून आले.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत नागरिकांना दर्जेदार आणि परवडणाऱ्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी असतानाही प्राथमिक आरोग्य सेवांचे प्रभावी बळकटीकरण करण्यात अपयश आल्याचा ठपका प्रशासनाने ठेवला आहे. याशिवाय शहरातील भटक्या श्वानांची वाढती संख्या, निर्बिजीकरण मोहिमेतील संथगती आणि श्वान निवारागृह व्यवस्थापनातील त्रुटींबाबतही प्रशासनाने नाराजी व्यक्त केली आहे.

दरम्यान, आमदार कुमार आयलानी यांच्या पत्राद्वारे काही डॉक्टरांकडून आर्थिक लाभाची मागणी केल्याच्या गंभीर तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त झाल्याचाही आदेशात उल्लेख करण्यात आला आहे. या सर्व बाबींचा विचार करून डॉ. मोहिनी धर्मा यांना वैद्यकीय आरोग्य अधिकारी पदाचा कार्यभार कायम ठेवणे योग्य नसल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

## शिक्षकांच्या प्रलंबित विषयांवर चर्चा

**ठाणे :** जिल्हा परिषद, ठाणे येथे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव तसेच विधान परिषदेचे आमदार निरंजन डावखरे यांच्या उपस्थितीत प्राथमिक शिक्षकांच्या विविध प्रलंबित विषयांवर सविस्तर बैठक पार पडली.

शिक्षकांच्या सेवाविषयक मागण्या, पदोन्नती आणि वेतनश्रेणीसंबंधी महत्त्वाच्या विषयांवर या बैठकीत सकारात्मक चर्चा करण्यात आली. बैठकीत शिक्षक पदोन्नती प्रक्रिया गतीमान करण्याबाबत, आदिवासी उपयोजना क्षेत्रात कार्यरत शिक्षकांना एस-१४ वेतनश्रेणी लागू करण्याबाबत तसेच पदवीधर विषय शिक्षकांच्या वेतनश्रेणीसंदर्भातील विविध मुद्द्यांवर सखोल विचारविनिमय करण्यात आला.प्रशासनाच्या वतीने संबंधित विषयांवरील सद्यस्थितीची माहिती देण्यात आली.

**THIS IS AN ADDENDUM TO THE PUBLIC ANNOUNCEMENT FOR COMPLIANCE PURPOSE ONLY AND DOES NOT CONSTITUTE AN INVITATION OR OFFER TO ACQUIRE, PURCHASE OR SUBSCRIBE TO SECURITIES NOR IS IT A PROSPECTUS ANNOUNCEMENT.**

vedanta iron & steel

**VEDANTA IRON AND STEEL LIMITED**
**Corporate Identification Number (CIN): U24109MH2023PLC411777**
**REGISTERED OFFICE: C-103 Atul Projects, Corporate Avenue New Link, Chakala MIDC, Mumbai, Maharashtra, India – 400093**
**Tel: +91 22 6643 4500 | Email id: visl.cs@vedanta.co.in | Website: https://www.vedantaironandsteel.com**
**Contact Person: Ms. Tina Lakhani, Company Secretary and Compliance Officer**

**ADDENDUM 1 TO THE PUBLIC ANNOUNCEMENT DATED JUNE 10, 2026 ISSUED BY VEDANTA IRON AND STEEL LIMITED**

Capitalised terms used but not defined herein have the meaning assigned to them in the Information Memorandum and the Public Announcement of Vedanta Iron and Steel Limited dated June 10, 2026.

Point 18, is added, by way of this addendum 1, to the public announcement dated June 10, 2026 issued by Vedanta Iron and Steel Limited, as below:

**18. REGULATORY ACTION IF ANY - DISCIPLINARY ACTION TAKEN BY STOCK EXCHANGE / SEBI AGAINST THE PROMOTERS IN LAST 5 FINANCIAL YEARS:**

**Show cause notice issued by SEBI against Sterlite Industries Limited (now merged with VEDL)**

SEBI issued a show cause notice to Sterlite Industries India Limited (now merged with VEDL) ("SIIL") to show cause as to why it should not proceed against SIIL under Section 24 read with Section 27 of the SEBI Act, 1992 for alleged violation of Regulation 4(a) and 4(d) of the SEBI (Prohibition of Fraudulent and Unfair Trade Practices relating to Securities Market) Regulations, 1995 ("Alleged Violations"). SIIL replied to the show cause notice. Thereafter, the Chairman of SEBI ("Authority") passed an order dated April 19, 2001, prohibiting SIIL from accessing the capital markets for a period of two years and ordering prosecution proceedings against SIIL, through its directors namely Anil Agarwal, Tarun Jain and Shashikant, for the Alleged Violations ("Impugned Order"). Accordingly, SEBI proceeded to file a criminal complaint before the 8th Additional Chief Metropolitan Magistrate's Court at Esplanade Mumbai ("Trial Court"). SIIL filed an appeal before the Securities Appellate Tribunal ("SAT") against the Impugned Order. The Impugned Order was subsequently overruled by the SAT vide an order dated October 22, 2001, on the basis that inter alia there was insufficient material evidence to establish that SIIL had, directly or indirectly, engaged in market manipulation and allowed the appeal filed by SIIL ("SAT Order"). SEBI filed an appeal before the High Court of Judicature at Bombay ("Bombay High Court") against SIIL, its Director, Anil Agarwal and others ("Accused") challenging the SAT Order which is currently pending. SIIL filed a criminal application before the Bombay High Court to stay the criminal proceedings initiated by SEBI through its criminal complaint since the Impugned Order was set aside by SAT. The Bombay High Court inter alia vide an order dated November 22, 2006 admitted the application and granted an interim stay on the criminal proceedings. As per the amendment to the SEBI Act, 1992 through the Securities Law (Amendment) Act, 2014, the jurisdiction of the matter has been transferred from the Trial Court to the sessions court. The aforementioned interim stay on the criminal proceedings granted by the Bombay High Court continues to be in force as on date. The matter is currently pending.

The above addition is to be read in conjunction with the public announcement dated June 10, 2026 issued by Vedanta Iron and Steel Limited. The information in this Addendum supplements the public announcement dated June 10, 2026 issued by Vedanta Iron and Steel Limited and updates the information therein, as applicable.

**For Vedanta Iron and Steel Limited**
**sd/-**

Tina Lakhani
Company Secretary & Compliance Officer
ACS: 34723

**Date: June 11, 2026**
**Place: Panaji, Goa**